जनमानसाचा निडर आवाज...

# पुणे प्राईम न्यूज

मुख्य संपादक : जनार्दन दांडगे




दैनिक | वर्ष १ | अंक २२६ | गुरुवार, १२ मार्च २०२६ | मूल्य : २ रु. | पाने : ४ | RNI NO - MAHMAR/2022/84210

## संक्षिप्त

### अजितदादांनंतर बारामतीचा गड कोण लढवणार?

**बारामती, ता. ११ :** उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अपघाती निधनानंतर रिक्त झालेल्या बारामती विधानसभा मतदारसंघासाठी पोटनिवडणुकीच्या हालचाली सुरू झाल्या आहेत. या प्रक्रियेचा भाग म्हणून प्रशासनाने अंतिम मतदार यादी प्रसिद्ध केली असून बारामती मतदारसंघातील एकूण मतदारसंख्या ३८३७६७ इतकी नोंदवण्यात आली आहे. निवडणूक आयोगाच्या नियोजनानुसार ९ फेब्रुवारी २०२६ रोजी या मतदारसंघाची प्रारूप मतदार यादी जाहीर करण्यात आली होती. त्यानंतर ९ फेब्रुवारी ते २५ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत नागरिकांकडून दावे आणि हरकती स्वीकारण्यात आल्या. प्राप्त अर्जांची छाननी करून आवश्यक त्या दुरुस्त्या केल्यानंतर १० मार्च २०२६ रोजी अंतिम मतदार यादी प्रसिद्ध करण्यात आली. या अंतिम यादीत पुरुष मतदारांची संख्या १९३४९६, महिला मतदारांची संख्या १९०२७१ तर इतर मतदारांची संख्या २४ इतकी आहे. एकूण ३८३७६७ मतदार या मतदारसंघात नोंदवले गेले असून आगामी पोटनिवडणुकीसाठी ही यादी आधार मानली जाणार आहे.

# गॅस तुटवड्यांच्या अफवांनी जिल्ह्यात ग्राहकांची पळापळ..!

## पुरवठा सुरळीत असतानाही अकॅडमीकडून विद्यार्थ्यांना सुट्टी

**पुणे, ता. ११ :** इराण-इस्त्राईल युद्धाच्या पार्श्वभूमीवर देशात घरगुती गॅस सिलिंडरचा तुटवडा निर्माण होईल, अशी भीती नागरिकांच्या मनात पसरू लागली आहे. परिणामी अनेक नागरिकांनी गॅस एजन्सीकडे धाव घेत सिलिंडर तातडीने बुक करण्यास सुरुवात केली आहे. मात्र गॅस कंपन्या आणि वितरकांनी स्पष्ट केले आहे की, सध्या घरगुती गॅसचा पुरवठा पूर्णपणे सुरळीत असून तुटवड्याची कोणतीही परिस्थिती नाही.

व्यावसायिक गॅस सिलिंडरमध्ये अंदाजे १२० रुपयांची, तर घरगुती गॅसमध्ये ६० रुपयांची वाढ झाल्याची माहिती मिळत आहे. मात्र दरवाढ असूनही पुरवठा सुरळीत असल्याचे वितरकांनी सांगितले आहे. सावधगिरीचा उपाय म्हणून काही ठिकाणी व्यावसायिक गॅस वितरणावर मर्यादा घालण्यात आल्या आहेत. भारत एलपीजी गॅसचा पुरवठा अनेक देशांमधून करतो तसेच देशांतर्गत उत्पादनही मोठ्या प्रमाणावर केले जाते. त्यामुळे एखाद्या देशातील युद्ध किंवा तणावाचा तात्काळ परिणाम भारतातील गॅस पुरवठ्यावर होण्याची शक्यता कमी असते. तसेच देशात मोठ्या प्रमाणावर साठवणूक व्यवस्था असल्यामुळे अचानक तुटवडा निर्माण होण्याची शक्यता नसल्याचेही सांगण्यात येत आहे.

गॅस कंपन्यांनी नागरिकांना आवाहन केले आहे की, अफवा आणि सोशल मीडियावरील अपूर्ण माहितीवर विश्वास ठेवू नये. गरज नसताना मोठ्या प्रमाणात सिलिंडर बुक केल्यास वितरण यंत्रणेवर तात्पुरता ताण निर्माण होऊ शकतो आणि काही ग्राहकांना सिलिंडर मिळण्यात उशीर होऊ शकतो. असे सांगितले असले तरी पुणे शहरासह जिल्ह्यात गॅसचा पुरवठा करणाऱ्या



एजन्सीच्या समोर ग्राहकांनी लांबच्या लांब रांगा लावल्याचे पाहायला मिळत आहेत.

उरुळी कांचन येथील सुरानंद एचपी गॅस एजन्सीचे संभाजी बापू कांचन यांनी सांगितले की, व्यावसायिक वापराच्या काही सिलिंडरच्या पुरवठ्यावर तात्पुरता परिणाम झाला असला तरी घरगुती गॅस सिलिंडरचा पुरवठा नियमित सुरू आहे. सोशल मीडियावर पसरत असलेल्या अफवांमुळे नागरिक मोठ्या प्रमाणात सिलिंडर बुक करत असल्याचे दिसून येत आहे. साधारणपणे उरुळी कांचन आणि आसपासच्या भागातून रोज २५० ते ३०० गॅस बुकिंग होत होती. पण सध्या ही संख्या वाढून सुमारे ८०० ते ९०० पर्यंत पोहोचली आहे. अचानक वाढलेल्या मागणीमुळे काही ठिकाणी तात्पुरता ताण निर्माण होत असल्याचे सांगण्यात आले. भिगवण आणि यवत परिसरातही गॅसबाबत संभ्रम निर्माण झाल्याचे दिसत आहे. काही ठिकाणी नागरिक पहाटेपासून गॅस एजन्सीसमोर रांगा लावत असल्याचे चित्र पाहायला मिळत आहे. कडक उन्हातही अनेक नागरिक तासन्तास सिलिंडर मिळण्याची वाट पाहत उभे राहत आहेत.

दरम्यान, बारामती येथील एका अकॅडमीने मात्र वेगळाच निर्णय घेतला आहे. विदेशी युद्धजन्य परिस्थितीमुळे व्यावसायिक गॅसची उपलब्धता कमी होत असल्याचे कारण देत अकॅडमीने इयत्ता ८ वी व ९ वीच्या विद्यार्थ्यांना १० मार्चपासून अंदाजे ३ ते ४ दिवसांची आपत्कालीन सुट्टी जाहीर केली आहे. मेस व्यवस्थापनात अडचणी निर्माण झाल्याचा दावा संस्थेकडून करण्यात आला आहे. हॉस्टेलमधील विद्यार्थ्यांना पालकांशी संपर्क साधून घरी पाठविले आहे. मात्र या निर्णयामुळे पालक आणि विद्यार्थ्यांमध्ये संतापाची लाट पसरली आहे.

पुणे शहरासह जिल्ह्यातील शाळा, हॉस्टेल, कंपन्या आणि कॅन्टीनमध्ये गॅस पुरवठा सुरू असताना केवळ एका अकॅडमीने सुट्टी जाहीर केल्याने अनेक प्रश्न उपस्थित झाले आहेत. लाखो रुपये फी भरून प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचे शिक्षण काही दिवस ठप्प झाल्याने या नुकसानीची जबाबदारी अकॅडमी घेणार का? तसेच विद्यार्थ्यांच्या फीमधून काही रक्कम पालकांना परत केली जाणार का? असा सवाल आता पालकांकडून उपस्थित केला जात आहे.

या प्रकरणामुळे शिक्षण क्षेत्रातही चर्चा रंगू लागली असून, गॅस तुटवड्याच्या अफवांमुळे निर्माण झालेल्या परिस्थितीवर प्रशासनाने स्पष्ट भूमिका घ्यावी, अशी मागणीही पुढे येत आहे.

> गॅसचा तुटवडा कायम राहिला आणि वेळेत सिलिंडर उपलब्ध झाले नाहीत तर अनेक कुटुंबांना पर्याय म्हणून इलेक्ट्रिक शेगडीचा वापर करावा लागण्याची शक्यता आहे. मात्र ग्रामीण भागात वीजपुरवठ्याच्या अडचणी लक्षात घेता काही महिलांवर पुन्हा एकदा पारंपरिक चुलीवर स्वयंपाक करण्याची वेळ येऊ शकते. आधुनिक सुविधांच्या युगात पुन्हा धुराच्या चुलीकडे वळण्याची वेळ येऊ नये, अशी अपेक्षा गृहिणींकडून व्यक्त होत आहे.
> - **शुभांगी जगदाळे,** (तक्रारवाडी, ता. इंदापूर)

> बुकिंग करूनही व्यावसायिक गॅस उपलब्ध होत नाहीत. आणखी दोन ते तीन दिवस गॅस उपलब्ध नाहीत झाले तर हॉटेल बंद करून घरी बसावे लागेल. अगोदरच खाद्य तेल व वाढती महागाई यामुळे हॉटेल व्यावसायिकांचे कंबरडे मोडले आहे. हॉटेल बंद झाले तर कामगारांवरही उपासमारीची वेळ येणार आहे.
> - **ओंकार रानवडे,** (हॉटेल सोनाई व्हेज, उरुळी कांचन, ता. हवेली)

# विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी योग आवश्यक : स्वामी परमार्थदेव

आदित्य बोराटे

इंदापूर, ता. ११ : योग ही केवळ शारीरिक व्यायामाची पद्धत नसून ती जीवन जगण्याची शिस्तबद्ध कला आहे. निरोगी शरीरातच निरोगी मन आणि उज्ज्वल भविष्य दडलेले असते. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या शरीर, मन आणि बुद्धीच्या सर्वांगीण विकासासाठी योग अत्यावश्यक आहे, असे प्रतिपादन पतंजली योगपीठ हरिद्वारचे मुख्य केंद्रीय प्रभारी प.पू. स्वामी परमार्थदेवजी महाराज यांनी केले.

बावडा येथील श्री शिवाजी एज्युकेशन संस्थेच्या शैक्षणिक संकुलातील श्री शिवाजी विद्यालयाच्या आवारात पतंजली योगपीठ हरिद्वार संचलित पतंजली योग समिती व भारत स्वाभिमान ट्रस्ट, इंदापूर यांच्या वतीने विद्यार्थ्यांसाठी आयोजित एकदिवसीय




योग शिबिरात ते मार्गदर्शन करत होते. मंगळवारी (ता. १०) पार पडलेल्या या शिबिराचे उद्घाटन राष्ट्रीय सहकारी साखर महासंघ, नवी दिल्लीचे अध्यक्ष हर्षवर्धन पाटील व स्वामी परमार्थदेवजी महाराज यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून करण्यात आले.

यावेळी बोलताना स्वामी परमार्थदेवजी म्हणाले की, विद्यार्थ्यांनी जीवनात संयम, शिस्त आणि सकारात्मकता जोपासणे अत्यंत महत्त्वाचे आहे. रागावर नियंत्रण ठेवणे आणि मन शांत ठेवणे हे यशस्वी जीवनाचे सूत्र असून त्यासाठी योग व प्राणायामाचा नियमित सराव आवश्यक आहे. योग व प्राणायाम ही निरोगी जीवनाची प्रभावी जीवनशैली असल्याचेही त्यांनी नमूद केले.

याप्रसंगी स्वामी परमार्थदेवजी महाराज यांनी विद्यार्थ्यांना विविध योगासने व प्राणायामांची प्रात्यक्षिके करून दाखवली. विद्यार्थ्यांनीही उत्स्फूर्तपणे योगासनांचा सराव केला. तसेच हर्षवर्धन पाटील यांनीही स्वामीजींसोबत योगासनांचा लाभ घेतला.

या योग शिबिराला उदयसिंह पाटील, मनोज पाटील, किरण पाटील, डॉ. लक्ष्मण आसबे, स्वप्निल घोगरे, पवनराजे घोगरे, संतोष सूर्यवंशी, अमोल घोगरे, रणजीत गिरमे, रणजीत घोगरे, आचार्य प्रितीश लाड, आचार्य अविनाश, चंद्रशेखर खापणे, योगरत्न दत्तात्रय अनपट (पतंजली योग समिती, इंदापूर), प्राचार्य दशरथ घोगरे, ग्रामस्थ, शिक्षक-शिक्षिका व मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शब्बीर मुलाणी व अमर निलाखे यांनी केले. तर आभार उदयसिंह पाटील यांनी मानले.

# लोणी काळभोरचे ग्राम महसूल अधिकारी बाळासाहेब वनवे निलंबित

**लोणी काळभोर, ता. ११ :** कर्तव्य बजावताना गंभीर हलगर्जीपणा आणि प्रशासनाची प्रतिमा मलिन करणाऱ्या निष्काळजी कारभाराचा अखेर फटका बसला असून लोणी काळभोर येथील ग्राम महसूल अधिकारी बाळासाहेब श्रीपती वनवे यांना जिल्हाधिकाऱ्यांनी तत्काळ प्रभावाने निलंबित केले आहे. प्रशासनाच्या कामकाजात झालेल्या गंभीर त्रुटींमुळे ही कडक कारवाई करण्यात आल्याने महसूल विभागात एकच खळबळ उडाली आहे.

तहसिलदार तथा तालुका कार्यकारी दंडाधिकारी कार्यालय, लोणी काळभोर यांच्या अहवालानंतर हा प्रकार उघडकीस आला. संबंधित अधिकारी पदावर कार्यरत असताना त्यांनी कर्तव्यात अक्षम्य आणि गंभीर




हलगर्जीपणा केल्याचे स्पष्ट झाल्यानंतर जिल्हाधिकाऱ्यांनी महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम १९७९ मधील नियम ४ (१)(अ) अंतर्गत अधिकार वापरून त्यांना तात्काळ निलंबित केले. तसेच त्यांच्या विरोधात नियम ८ नुसार शिस्तभंगाची कारवाई करण्याचे आदेशही देण्यात आले आहेत.

निलंबनाच्या आदेशानुसार पुढील आदेश होईपर्यंत बाळासाहेब वनवे निलंबित राहणार असून त्यांच्या निलंबनकाळातील मुख्यालय तहसिल कार्यालय जुन्नर येथे निश्चित करण्यात आले आहे. जिल्हाधिकाऱ्यांची पूर्वपरवानगी घेतल्याशिवाय त्यांना मुख्यालय सोडण्यास मनाई करण्यात आली आहे. याशिवाय निलंबनाच्या कालावधीत त्यांनी कोणतीही खासगी नोकरी स्वीकारू नये किंवा कोणताही व्यवसाय करू नये, असे स्पष्ट बजावण्यात आले आहे.

दरम्यान, लोणी काळभोर अपर तहसील कार्यालयाने वनवे यांच्या दप्तराची सविस्तर तपासणी करून महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम १९७९ मधील नियम ८ नुसार विभागीय चौकशीचा प्रस्ताव एक महिन्याच्या आत जिल्हाधिकारी कार्यालयाकडे सादर करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. या कारवाईमुळे महसूल विभागातील निष्काळजीपणावर प्रशासनाने कडक बोट ठेवले असल्याची चर्चा सुरू असून भविष्यात अशा प्रकारच्या हलगर्जीपणाला कोणतीही माफी दिली जाणार नाही, असा स्पष्ट संदेश प्रशासनाने दिला आहे.

# मुंबई पालिकेतील अभियंत्यांच्या बदल्यांवरून नवा गोंधळ

**मुंबई, ता. ११ :** मुंबई महानगरपालिकेतील सहाय्यक अभियंता आणि दुय्यम अभियंता पदावरील अधिकाऱ्यांच्या मोठ्या प्रमाणातील बदल्यांवरून प्रशासनात आणि राजकीय वर्तुळात नवा वाद पेटला आहे. बदल्यांबाबत आलेल्या तक्रारींमुळे राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या प्रक्रियेला तात्पुरती स्थगिती दिली असताना आता महापौरांच्या पत्रामुळे पुन्हा एकदा या प्रकरणाने वेग घेतला आहे.



मुंबई महानगरपालिकेतील अनेक अभियंत्यांच्या बदल्या नियमबाह्य पद्धतीने केल्याच्या तक्रारी राज्य सरकारपर्यंत पोहोचल्या होत्या. सामाजिक कार्यकर्ते अनिल गलगली आणि मुंबई भाजप अध्यक्ष अमित साटम यांनी केलेल्या तक्रारीनंतर मुख्यमंत्री फडणवीस यांनी या प्रकरणात थेट हस्तक्षेप करत बदल्यांच्या आदेशांची अंमलबजावणी तात्काळ थांबविण्याचे निर्देश दिले होते. या घडामोडींच्या पार्श्वभूमीवर सनदी अधिकारी अमित सैनी यांचीही बदली करण्यात आल्याची माहिती समोर आली होती.मात्र, या स्थगितीच्या पार्श्वभूमीवरच मुंबईच्या महापौर रितु राजेश तावडे यांनी महानगरपालिकेतील संबंधित अधिकाऱ्यांना पत्र पाठवून सहाय्यक अभियंता आणि दुय्यम अभियंता पदावरील बदल्यांच्या आदेशांची अंमलबजावणी करण्याबाबत कार्यवाही करण्याचे निर्देश दिल्याचे समोर आले आहे. त्यामुळे प्रशासनात मोठा संभ्रम निर्माण झाला असून स्थगिती असूनही बदल्यांची प्रक्रिया पुन्हा सुरू होणार का, असा सवाल उपस्थित केला जात आहे. पालिकेतील वर्तुळात सध्या या प्रकरणाची जोरदार चर्चा सुरू आहे. मुख्यमंत्र्यांनी दिलेल्या स्थगितीनंतरही त्या निर्णयाला बगल देण्याचा प्रयत्न होत असल्याच्या चर्चेमुळे प्रशासनातील तणाव वाढला आहे. मोठ्या प्रमाणावर करण्यात आलेल्या या बदल्यांमुळे अनेक विभागांच्या कामकाजावर परिणाम होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

# महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धेच्या बोधचिन्हाचे अनावरण; फडणवीसांच्या हस्ते मानाच्या गदेचे पूजन

**मुंबई, ता. ११ :** मुंबईतील वर्षा या शासकीय निवासस्थानी ६८ व्या महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धेच्या अधिकृत बोधचिन्हाचे अनावरण आणि मानाच्या गदेचे पूजन राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते पार पडले. अत्यंत उत्साहपूर्ण वातावरणात झालेल्या या कार्यक्रमात आगामी स्पर्धेच्या आयोजनाची माहिती देण्यात आली.

महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर संघाच्या मान्यतेने आणि रामकृष्ण सातव पाटील यांच्या वतीने यंदाची महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धा १८ मार्च ते २२ मार्च २०२६ दरम्यान आयोजित करण्यात येणार आहे. राज्यभरातील नामांकित मल्ल या स्पर्धेत सहभागी होणार असून पारंपरिक कुस्तीप्रेमींमध्ये या




स्पर्धेबाबत मोठी उत्सुकता निर्माण झाली आहे. कार्यक्रमादरम्यान मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्पर्धेच्या नियोजनाची माहिती घेतली आणि यंदाच्या महाराष्ट्र केसरी स्पर्धेचे भव्य आयोजन केल्याबद्दल आयोजक रामकृष्ण सातव पाटील यांचे विशेष कौतुक केले. कुस्ती हा महाराष्ट्राच्या परंपरेचा महत्त्वाचा भाग असून अशा स्पर्धांमुळे राज्यातील मल्लांना प्रोत्साहन मिळते, असे त्यांनी यावेळी सांगितले.

या स्पर्धेच्या समारोप सोहळ्यास प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहण्याचे निमंत्रण आयोजक रामकृष्ण सातव पाटील यांनी मुख्यमंत्री फडणवीस यांना दिले असून त्यांनी ते स्वीकारले आहे. समारोप समारंभात यंदाच्या महाराष्ट्र केसरी विजेत्याला मुख्यमंत्री यांच्या हस्ते मानाची गदा आणि फॉर्च्युनर कार देऊन सन्मानित करण्यात येणार आहे.

या कार्यक्रमाला केंद्रीय राज्यमंत्री आणि महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर संघाचे उपाध्यक्ष मुरलीधर मोहोळ, महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर संघाचे सरचिटणीस पै. योगेश दोडके, पुणे जिल्हा कुस्तीगीर संघाचे अध्यक्ष मेघराज कटके, नगरसेवक अनिल सातव पाटील यांच्यासह कृष्णाजी बुचडे, नटराज सातव पाटील, सुनील जाधवराव, राहुल सातव, केतन जाधव, सागर सातव, महेश माने, मुकेश सातव, संदीप वारे, मयूर सातव आणि इतर मान्यवर उपस्थित होते. दरम्यान, महाराष्ट्र केसरी ही राज्यातील प्रतिष्ठेची कुस्ती स्पर्धा मानली जाते. या स्पर्धेतून अनेक नामांकित मल्ल पुढे आले असून ग्रामीण भागातील कुस्ती संस्कृतीला चालना देण्यात या स्पर्धेची महत्त्वाची भूमिका राहिली आहे. त्यामुळे यंदाच्या स्पर्धेकडेही राज्यातील कुस्ती प्रेमींचे लक्ष लागले आहे.

## संक्षिप्त

### लोणी काळभोर येथून दुचाकी लंपास

**लोणी काळभोर, ता. ११ :** मित्रासोबत जेवणासाठी गेलेल्या जिम ट्रेनरची पार्किंगमध्ये लावलेली दुचाकी अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची घटना घडली आहे. ही घटना लोणी काळभोर (ता. हवेली) ग्रामपंचायत हद्दीतील बोरकर वस्ती परिसरातील शेल पेट्रोल पंपाजवळील कानिफनाथ ऑटो गॅरेजसमोर ३ मार्चला रात्री साडेदहा वाजण्याच्या सुमारास घडली आहे. या प्रकरणी सुहास बाळासाहेब तिखे (वय ३१, व्यवसाय जिम ट्रेनर, रा. माळीमळा, लोणी काळभोर, ता. हवेली) यांनी लोणी काळभोर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार अज्ञात चोरट्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.. पोलीसांनी दिलेल्या माहितीनुसार, सुहास तिखे यांनी सन २०१७ मध्ये स्वतःच्या वापरासाठी यामाहा कंपनीची एफझेड २.५ मॉडेलची काळ्या रंगाची दुचाकी (आरटीओ क्र. MH १२ PE ३०००) खरेदी केली होती. तिखे यांनी त्यांची दुचाकी बोरकर वस्ती येथील शेल पेट्रोल पंपाजवळील कानिफनाथ ऑटो गॅरेजसमोर पार्क केली. जेवण करून रात्री सुमारे ११ वाजता ते परत पार्किंगच्या ठिकाणी आले असता, सुहास तिखे यांना त्यांची दुचाकी तेथे आढळून आली नाही. दरम्यान, तिखे यांनी परिसरात व दुसऱ्या दिवशी दिवसभर लोणी काळभोर व थेऊर फाटा परिसरात आपल्या दुचाकीचा शोध घेतला. मात्र ३० हजार रुपयांची दुचाकी आढळून आली नाही. याप्रकरणी अज्ञात चोरट्याच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



### पुणे-सोलापूर महामार्गावर दोन दुचाकींचा भीषण अपघात; दोन्ही चालक गंभीर जखमी

**पुणे, ता. ११ :** पुणे-सोलापूर महामार्गावर इंदापूर तालुक्यातील गलांडवाडी परिसरात दोन मोटारसायकलींची समोरासमोर धडक होऊन भीषण अपघात झाला. या अपघातात दोन्ही दुचाकी चालक गंभीर जखमी झाले असून त्यांच्यावर जवळच्या रुग्णालयात उपचार सुरू आहेत. या घटनेमुळे काही काळ महामार्गावर वाहतुकीतही अडथळा निर्माण झाला.मिळालेल्या माहितीनुसार, गलांडवाडी परिसरातून जाणाऱ्या पुणेसोलापूर राष्ट्रीय महामार्गावर दोन मोटारसायकली एकमेकांसमोर आल्याने हा अपघात घडला. नेमकी धडक कशी झाली याबाबत अधिकृत माहिती समोर आलेली नसली तरी प्राथमिक अंदाजानुसार वेग आणि रस्त्यावरील परिस्थिती यामुळे हा अपघात झाल्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. या मार्गावर वाहतुकीचा वेग जास्त असतो आणि अनेकदा दुचाकीस्वार नियमांकडे दुर्लक्ष करत असल्याने अपघातांचे प्रमाण वाढत असल्याचे स्थानिकांचे म्हणणे आहे. अपघात घडल्यानंतर परिसरातील नागरिकांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेतली. जखमी अवस्थेत पडलेल्या दोन्ही दुचाकीस्वारांना तातडीने रुग्णवाहिकेतून जवळच्या रुग्णालयात उपचारासाठी हलवण्यात आले. नागरिकांनी वेळेत मदत केल्यामुळे जखमींना लवकर उपचार मिळू शकले. दरम्यान, घटनास्थळी महाराष्ट्र सुरक्षा बलाचे अधिकारीही तातडीने दाखल झाले. त्यांनी वाहतूक सुरळीत करण्यास मदत केली तसेच पुढील मदतकार्य सुरू ठेवले. अपघातानंतर काही काळ वाहनांची गर्दी झाल्याने वाहतुकीचा वेग मंदावला होता.

# लोणी काळभोरमध्ये नर्सिंग विद्यार्थिनींचा आरोग्य जनजागृतीचा उपक्रम

## सीपीआर प्रात्यक्षिकातून जीवनदायी संदेश

**लोणी काळभोर, ता. ११ :** ग्रामीण भागात वाढत चाललेल्या असंसर्गजन्य आजारांबाबत जनजागृती करण्यासाठी पुण्यातील साधू वासवानी कॉलेज ऑफ नर्सिंगच्या विद्यार्थिनींनी पुढाकार घेतला असून लोणी काळभोर येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात आरोग्य जागर उपक्रम राबविण्यात आला. सातव्या सत्रातील विद्यार्थिनींनी विविध आजारांबाबत सविस्तर मार्गदर्शन करत नागरिकांमध्ये आरोग्याविषयी जागरूकता निर्माण करण्याचा प्रयत्न केला.

१० मार्च २०२६ रोजी आयोजित करण्यात आलेल्या या उपक्रमात विद्यार्थिनींनी गावातील महिलांपासून ज्येष्ठ नागरिकांपर्यंत अनेकांना मार्गदर्शन केले. यामध्ये उच्च रक्तदाब, मधुमेह, श्वसनाचे आजार, मानसिक आजार तसेच सांधेदुखी यांसारख्या आजारांबाबत माहिती देण्यात आली. बदललेली जीवनशैली, अयोग्य आहार, व्यायामाचा अभाव आणि ताणतणाव यामुळे हे आजार वाढत असल्याचे सांगत विद्यार्थिनींनी नागरिकांना आरोग्याची काळजी घेण्याचे आवाहन केले.

यावेळी उपस्थितांना जीव वाचविण्यासाठी अत्यंत महत्त्वाच्या ठरणाऱ्या सीपीआर (कार्डिओ पल्मोनरी रिससिटेशन) या प्राथमिक उपचाराचे प्रात्यक्षिक करून दाखविण्यात आले. अचानक हृदयविकाराचा झटका किंवा श्वासोच्छ्वास बंद झाल्यास सीपीआर तंत्रज्ञानामुळे रुग्णाचा जीव वाचविता येऊ शकतो, अशी माहिती विद्यार्थिनींनी दिली. प्रत्यक्ष प्रात्यक्षिकामुळे नागरिकांनीही मोठ्या उत्सुकतेने सहभाग घेतला.




या कार्यक्रमाला उपस्थित असलेले डॉ. मेहबूब लुकडे आणि डॉ. अर्चना जाधव यांनी विद्यार्थिनींच्या या उपक्रमाचे कौतुक केले. ग्रामीण भागात अशा प्रकारची आरोग्य जनजागृती अत्यंत गरजेची असल्याचे सांगत त्यांनी विद्यार्थिनींनी केलेल्या प्रयत्नांचे अभिनंदन केले. आरोग्य विषयक माहिती लोकांपर्यंत पोहोचविण्यासाठी तरुण आरोग्य कर्मचाऱ्यांची भूमिका महत्त्वाची असल्याचेही त्यांनी नमूद केले. याच उपक्रमाचा भाग म्हणून ११ मार्च रोजी गरोदर मातांसाठी विशेष मार्गदर्शन सत्र आयोजित करण्यात आले. गर्भावस्थेत घ्यावयाची काळजी, योग्य आहार, नियमित तपासणीचे महत्त्व आणि मातेसह बाळाच्या आरोग्याबाबत सविस्तर माहिती देण्यात आली. त्यामुळे उपस्थित महिलांनी या उपक्रमाला उत्स्फुर्त प्रतिसाद दिला.

दरम्यान, हा उपक्रम यशस्वी करण्यासाठी प्राध्यापिका नमिता पाठक, रुपाली शिंदे, शोभा पाटील आणि प्रियंका कदम यांनी विद्यार्थिनींना मार्गदर्शन केले. विद्यार्थिनींच्या या प्रयत्नामुळे लोणी काळभोर परिसरात आरोग्याबाबत सकारात्मक जनजागृती झाली असून ग्रामीण भागात आरोग्य शिक्षणाची गरज अधोरेखित झाली आहे.

### अवसरी येथे घरगुती वादातून पत्नीला मारहाण

**इंदापूर, ता. ११ :** अवसरी (ता. इंदापूर) गावात घरगुती वादातून पतीने पत्नीला मारहाण करून घरातील कपड्यांना आग लावल्याची घटना घडली आहे. या प्रकारामुळे परिसरात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. या प्रकरणी इंदापूर पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला असून पोलिसांनी पुढील तपास सुरू केला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, रूपाली सागर माने या काही दिवसांपासून आपल्या माहेरी अवसरी येथे राहत होत्या. दरम्यान त्यांचे पती सागर शशिकांत माने हे दारूच्या नशेत तेथे आले. त्यानंतर दोघांमध्ये वाद झाला. वाद वाढल्यानंतर सागर माने यांनी रूपाली माने यांना शिवीगाळ करत लाथाबुक्यांनी मारहाण केली, अशी माहिती समोर आली आहे. याच दरम्यान रागाच्या भरात त्यांनी घरातील वापरातील कपड्यांना आग लावली. या घटनेत घरातील अनेक कपडे जळून नुकसान झाले आहे. घटनेनंतर परिसरातील नागरिकांनी परिस्थिती नियंत्रणात आणण्यास मदत केली.

# लवकर ऑफिसला या आणि लवकर घरी जा; महिलांसाठी राज्य सरकारचा निर्णय

**मुंबई, ता. १० :** जागतिक महिला दिनाच्या पार्श्वभूमीवर राज्यातील महिला शासकीय कर्मचाऱ्यांसाठी महत्त्वाचे निर्णय जाहीर करण्यात आले आहेत. राज्याच्या उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी महिलांना काम आणि कुटुंब यामध्ये समतोल राखता यावा यासाठी दोन मोठ्या योजना जाहीर केल्या. या निर्णयांमुळे विशेषतः मुंबई महानगर प्रदेश मधील महिला कर्मचाऱ्यांना दिलासा मिळण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.

सर्वात महत्त्वाचा निर्णय म्हणजे प्रसुती रजेबाबत करण्यात आलेला बदल. केंद्र सरकारच्या धर्तीवर राज्यातील महिला कर्मचाऱ्यांना १८० दिवसांची प्रसुती रजा देण्याचा निर्णय आधीच लागू करण्यात आला होता. आता या रजेनंतर गरज भासल्यास महिलांना कमाल १ वर्षापर्यंत अर्ध्या वेतनावर रजा घेण्याची परवानगी देण्यात येणार आहे. या रजेसाठी वैद्यकीय प्रमाणपत्राची सक्तीही नसणार आहे. मातृत्वानंतर आई आणि नवजात बाळाला अधिक काळ एकत्र राहता यावे आणि महिलांना कामाचा ताण न येता कुटुंबाची जबाबदारी पार पाडता यावी, हा या निर्णयामागील मुख्य उद्देश असल्याचे सांगण्यात आले.



याशिवाय Come Early, Go Early किंवा मराठीत लवकर या, लवकर जा ही योजना देखील जाहीर करण्यात आली आहे. या योजनेअंतर्गत मुंबई महानगर प्रदेशातील महिला शासकीय कर्मचारी सकाळी ९:१५ ते ९:४० या वेळेत कार्यालयात येऊ शकतात. त्या जितक्या मिनिटे लवकर कार्यालयात येऊन काम सुरू करतील, तितकीच मिनिटे त्यांना संध्याकाळी कार्यालयातून लवकर जाण्याची मुभा दिली जाईल. कमाल ३० मिनिटांपर्यंत ही सवलत मिळू शकते. मुंबईसारख्या शहरात गर्दीच्या वेळेत प्रवास करणे महिलांसाठी अनेकदा कठीण ठरते. त्यामुळे गर्दी टाळून सुरक्षित आणि सोयीस्कर प्रवास करता यावा, हा या योजनेमागील विचार आहे.

दरम्यान, महिलांच्या सुरक्षिततेसाठी प्रस्तावित असलेल्या शक्ती फौजदारी कायदा २०२० या कायद्याबाबतही त्यांनी भूमिका स्पष्ट केली. केंद्र सरकारने १ जुलै २०२४ पासून भारतीय न्याय संहिता लागू केल्यानंतर पूर्वीचे विधेयक परत घेण्यात आले होते. आता नव्या कायद्याच्या चौकटीत आवश्यक सुधारणा करून महिलांच्या सुरक्षेसाठी कडक तरतुदी पुन्हा आणण्याचा प्रस्ताव राज्य सरकारच्या विचाराधीन असल्याचे त्यांनी सांगितले.

### रांजणगाव गणपतीच्या उपसरपंचपदी शोभा शेळके बिनविरोध

पोपटराव पाचंगे

रांजणगाव गणपती, ता. ११ : रांजणगाव गणपती येथील ग्राम पंचायतीच्या उपसरपंचपदी शोभा रमेश शेळकेयांची बिनविरोध निवड करण्यात आली. सरपंच सुवर्णा वायदंडे यांच्या अध्यक्षतेखाली उपसरपंच पदाची निवडणूक पार पडली.

मावळते उपसरपंच श्रीकांत पाचुंदकर यांनी इतर ग्रामपंचायत सदस्यांना संधी मिळावी या हेतूने आपल्या पदाचा राजीनामा दिला होता. त्यामुळे रिक्त झालेल्या जागेसाठी ग्रामपंचायत कार्यालयात सदस्यांची विशेष सभा घेण्यात आली. या सभेत उपसरपंच पदासाठी शोभा शेळके यांचा एकमेव अर्ज आल्याने त्यांची बिनविरोध निवड झाल्याची घोषणा निवडणूक निर्णय अधिकारी तथा सरपंच सुवर्णा वायदंडे यांनी केली. यावेळी घोडगंगा सहकारी साखर कारखान्याचे संचालक ॲड. आबासाहेब पाचुंदकर, आंबेगाव-शिरूर राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष मानसिंग पाचुंदकर, उद्योजक प्रा. माणिक खेडकर आणि श्रीकांत पाचुंदकर यांच्या हस्ते नवनिर्वाचित उपसरपंच शोभा शेळके यांचा फेटा बांधून, शाल व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी ग्रामपंचायत सदस्य, ग्रामपंचायत अधिकारी गंगाधर देशमुख, ज्योती पाचुंदकर, महेश फंड तसेच ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# पूर्व हवेलीतील रस्त्यांचे सीमांकन करून त्यांना स्वतंत्र क्रमांक द्या : सुदर्शन चौधरी

**उरुळी कांचन, ता. ११ :** हवेली तालुक्यातील काही गावांमधील रस्त्यांच्या सीमांकनाच्या प्रश्नावर प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी उपविभागीय अधिकारी, हवेली यांची भेट घेऊन निवेदन सादर करण्यात आले. पंचायत समिती हवेलीचे सदस्य सुदर्शन जयप्रकाश चौधरी यांनी हे निवेदन देत महसूल व वन विभागाच्या २९ ऑगस्ट २०२५ रोजीच्या शासन निर्णयाची अंमलबजावणी तातडीने करण्याची मागणी केली.

या शासन निर्णयानुसार हवेली तालुक्यातील सोरतापवाडी, तरडे, वळती, शिंदवणे आणि उरुळी कांचन या गावांमध्ये गाव नकाशावर असलेल्या तसेच नोंद नसलेल्या सर्व रस्त्यांचे सीमांकन करून त्यांना स्वतंत्र क्रमांक देण्याची प्रक्रिया पूर्ण करणे अपेक्षित आहे. मात्र या निर्णयाची अंमलबजावणी अद्याप पूर्ण झालेली नसल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.



या भागातील शेतकऱ्यांना शेती रस्ते आणि गाव रस्त्यांबाबत अनेक अडचणींचा सामना करावा लागत असल्याचे चौधरी यांनी सांगितले. स्पष्ट सीमांकन नसल्यामुळे शेतजमिनीपर्यंत जाणाऱ्या मार्गांवरून अनेकदा वाद निर्माण होतात. काही ठिकाणी रस्त्यांची अधिकृत नोंद नसल्याने शेतकऱ्यांना शेतीकामासाठी आवश्यक असलेल्या वाहतुकीतही अडथळे निर्माण होतात. त्यामुळे शासन निर्णयानुसार सर्व रस्त्यांचे मोजमाप करून त्यांना अधिकृत क्रमांक देणे आवश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

यासंदर्भात प्रशासनाकडे वारंवार पाठपुरावा करूनही अद्याप ठोस कार्यवाही झालेली नसल्याची खंतही त्यांनी व्यक्त केली. त्यामुळे हा प्रश्न तातडीने निकाली काढून झालेल्या कार्यवाहीचा अहवाल देण्याची मागणी निवेदनातून करण्यात आली आहे.

शेतकऱ्यांच्या दृष्टीने रस्त्यांचे स्पष्ट सीमांकन आणि त्याची अधिकृत नोंद अत्यंत महत्त्वाची ठरते. यामुळे भविष्यात जमीन आणि रस्त्यांबाबत होणारे वाद टाळता येतात तसेच शेतीसाठी आवश्यक असलेल्या वाहतुकीला गती मिळते. त्यामुळे प्रशासनाने या विषयाकडे गांभीर्याने लक्ष देण्याची अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे.

दरम्यान, उपविभागीय अधिकारी माने यांनी या निवेदनाची दखल घेत तहसीलदारांशी चर्चा करून पुढील आठवड्यात या संदर्भात बैठक आयोजित करण्याचे आश्वासन दिले. शेतकऱ्यांच्या हितासाठी हा पाठपुरावा पुढेही सुरू ठेवणार असल्याचे सुदर्शन चौधरी यांनी सांगितले.

# जुन्नरमध्ये भरदिवसा तरुणाकडून विद्यार्थिनीवर धारदार शस्त्राने हल्ला

**जुन्नर, ता. ११ :** येथील महाविद्यालयीन विद्यार्थिनीवर झालेल्या हल्ल्याच्या घटनेमुळे परिसरात मोठी खळबळ उडाली आहे. आदिवासी मुलींच्या शासकीय वस्तीगृहासमोर दिवसाढवळ्या एका तरुणाने धारदार शस्त्राने विद्यार्थिनीवर हल्ला केल्याची धक्कादायक घटना घडली.

मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार, गौरी संजय सावळे (वय २०) ही महाविद्यालयीन विद्यार्थिनी सकाळी सुमारे १० वाजण्याच्या सुमारास नेहमीप्रमाणे वस्तीगृह परिसरात होती. त्याच वेळी महेश मुरलीधर डामसे या तरुणाने अचानक तिच्यावर धारदार हत्याराने हल्ला केला. आरोपीने विद्यार्थिनीच्या चेहऱ्यावर आणि मानेवर अनेक वार केल्याची माहिती समोर आली आहे.




दिवसाढवळ्या घडलेल्या या घटनेमुळे परिसरात एकच खळबळ उडाली. हल्ला केल्यानंतर आरोपी महेश डामसे घटनास्थळावरून तात्काळ फरार झाला. घटनास्थळी उपस्थित असलेल्या स्थानिक नागरिकांनी आणि विद्यार्थ्यांनी जखमी अवस्थेतील गौरी सावळे हिला तातडीने रुग्णालयात दाखल केले. तिच्यावर उपचार सुरू असल्याची माहिती मिळत आहे.

प्राथमिक तपासात आरोपी आणि जखमी विद्यार्थिनी हे दोघेही एकाच गावातील रहिवासी असल्याचे समोर आले आहे. आरोपी महेश डामसे हा काही दिवसांपासून विद्यार्थिनीला त्रास देत असल्याची माहितीही मिळत असून या पार्श्वभूमीवरच हा हल्ला झाला असावा असा संशय व्यक्त केला जात आहे. घटनेची माहिती मिळताच जुन्नर पोलीस ठाण्याचे अधिकारी आणि कर्मचारी तातडीने घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी परिसराची पाहणी करून पंचनामा सुरू केला असून फरार आरोपीचा शोध घेण्यासाठी विशेष पथक तयार करण्यात आले आहे.

दरम्यान, या धक्कादायक घटनेमुळे जुन्नर शहरात भीती आणि संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे. दिवसाढवळ्या विद्यार्थिनीवर हल्ला झाल्याने नागरिकांनी आरोपीला तातडीने अटक करण्याची मागणी केली आहे. या प्रकरणाचा पुढील तपास जुन्नर पोलीस करत आहेत.




# इंदापुरात हिंदू मुस्लिम बांधवांकडून एकोप्याचे दर्शन

आदित्य बोराटे

इंदापूर, ता. ११ : हिंदू-मुस्लिम बांधवांमध्ये एकोपा निर्माण होण्याबरोबरच दोन्ही समाजांना जोडणारा दुवा म्हणून इफ्तार पार्टीचे आयोजन केले जाते. त्यामुळे एकमेकांच्या सुखदु:खांत सामील होता येते. अशा प्रकारचे कार्यक्रम वारंवार झाल्यास दोन्ही समाजांतील एकोपा वाढीस मदत होईल, असे प्रतिपादन इंदापूरचे नगराध्यक्ष भरत शहा यांनी केले.

शहरातील दर्गाह मज्जिद चौकात सामाजिक कार्यकर्ते अर्शद सय्यद मित्र परिवाराच्या वतीने मंगळवारी (ता. १०) मार्च रोजी सायंकाळी आयोजित इफ्तार पार्टीत ते बोलत होते. समाजात बंधुभाव वाढावा याकरिता मुस्लिम बांधव पहाटेपासून कडक उपवास धरतात. हे उपवास केवळ आपल्याच समाजापुरतेच मर्यादित न ठेवता ते सर्व धर्मांतील लोकांच्या कल्याणाकरिता धरतात. त्यात पवित्र रमजान महिन्यातील अशा इफ्तार पार्टीमुळे दोन्ही समाजांतील एकोपा वाढण्यास मदत होते. त्यामुळे अशा प्रकारच्या कार्यक्रमांचे वारंवार आयोजन केल्यास त्याचा संपूर्ण मानवजातीला लाभ होईल. अँड.आसिफ बागवान,फिरोज पठाण यांनी उपस्थितांचे स्वागत केले; तर सामाजिक कार्यकर्ते अर्शद सय्यद यांनी पवित्र रमजान महिन्याचे महत्त्व विशद केले. यावेळी इंदापूरचे नगराध्यक्ष भरत शहा, नगरसेवक अक्षय सूर्यवंशी, शकील सय्यद, उमेश मखरे, शुभम पवार, पोपट शिंदे,सामाजिक कार्यकर्ते बाळासाहेब सरवदे, अशोक मखरे सर, शिवाजी मखरे, संदिपान कडवळे, प्रशांत उंबरे, अजिंक्य जावीर, सुभाष खरे, रितेश जगताप, गफुर सय्यद, मनोज राजगुरू, गणेश महाजन, प्रवीण हरणावळ, आरिफ पठाण, अब्दुल मुशाईदी मुस्लिम समाजातील मान्यवर उपस्थित होते.

# पुणे शहर व परिसरातील जवळपास ८५ टक्के हॉटेलला टाळे लागण्याची शक्यता?

**पुणे, ता. ११ :** पुणे शहरात सध्या एक वेगळेच संकट निर्माण झाले असून येथील प्रसिद्ध खाद्यपदार्थ आणि हॉटेल्सवर टाळे लागण्याची भीती व्यक्त केली जात आहे. ढोकळा, पुडाची वडी, कचोरी आणि समोसा यांसारख्या चविष्ट पदार्थांसाठी ओळखल्या जाणाऱ्या पुण्यात आता गॅसचा मोठा तुटवडा जाणवत आहे. विशेष म्हणजे जागतिक पातळीवरील अमेरिका आणि इराण यांच्यातील युद्धाचा थेट परिणाम पुणेकरांच्या ताटापर्यंत येऊन पोहोचला आहे. या युद्धजन्य परिस्थिती मुळे इंधनाच्या पुरवठ्यावर परिणाम झाला असून पुण्यात व्यावसायिक एलपीजी गॅस सिलिंडर मिळणे कठीण झाले आहे.



शहरातील बहुतांश गॅस केंद्रांवर व्यावसायिक सिलिंडरचा साठा संपला असून नवीन पुरवठा कधी होईल याची शाश्वती नाही. ज्या हॉटेल मालकांनी आधीच साठा करून ठेवला होता त्यांचे काम सध्या सुरू आहे, मात्र इतरांना मोठी अडचण येत आहे. येत्या २ दिवसात पुण्यातील जवळजवळ ८५ टक्के हॉटेल्स बंद राहण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. अनेक ठिकाणी गॅस नसल्यामुळे पारंपरिक पद्धतीने चुलीवर स्वयंपाक केला जात आहे, परंतु यामुळे ग्राहकांना वेळेवर सेवा देणे कठीण होत आहे. हॉटेल व्यावसायिकांना मोठ्या ऑर्डर रद्द कराव्या लागत असल्याने त्यांचे लाखो रुपयांचे नुकसान होत आहे.

पुणे जिल्ह्यात एकूण २८ लाख एलपीजी ग्राहक आहेत, ज्यापैकी ४ लाख व्यावसायिक कनेक्शन्स आहेत. सध्या घरगुती गॅसचा पुरवठा सुरळीत ठेवण्याला प्राधान्य दिले जात असले तरी व्यावसायिक वापरासाठी १ लाख सिलिंडरचा तुटवडा निर्माण झाला आहे. ही समस्या फक्त पुण्यापुरती मर्यादित नसून लोणावळा आणि पिंपरी चिंचवडमध्येही पसरली आहे. पिंपरी चिंचवडमधील साडेसात हजार लघुउद्योगांना या टंचाईची झळ बसली असून अनेक कंपन्यांकडे केवळ ४ ते ५ दिवस पुरेल इतकाच साठा शिल्लक आहे. पुणे हे शिक्षणाचे आणि आयटी क्षेत्राचे मोठे केंद्र असल्याने येथे हजारो विद्यार्थी आणि नोकरदार राहतात. हे सर्व लोक जेवणासाठी बाहेरच्या हॉटेल्स किंवा पोळी भाजी केंद्रांवर अवलंबून असतात. हॉटेल्स बंद झाल्यास या लोकांच्या जेवणाचा मोठा प्रश्न निर्माण होणार आहे. सध्या तरी व्यावसायिक गॅस वितरण पूर्णपणे विस्कळीत झाल्याने सर्वसामान्यांपासून मोठ्या व्यापाऱ्यांपर्यंत सर्वांचीच चिंता वाढली आहे. ही परिस्थिती निवळण्यासाठी आता सरकारी स्तरावर काय पावले उचलली जातात, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# कोंढव्यात रिक्षाचालकावर गोळीबार ; चार जणांना अटक

**पुणे, ता. ११ :** रिक्षा वळवण्याच्या कारणावरून झालेल्या वादाचे रूपांतर हिंसक प्रकारात झाले आणि रिक्षा चालकावर देशी बनावटीच्या पिस्तुलातून गोळीबार करण्यात आल्याची घटना समोर आली आहे. या प्रकरणी कोंढवा पोलिसांनी तातडीने कारवाई करत चार संशयित आरोपींना अटक केली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, इब्राहिम उर्फ अज्जू अहमद शेख (वय ४८) हे रिक्षा चालक ८ मार्चच्या मध्यरात्री कोंढव्यातील काकडे वस्ती परिसरातून जात होते. महापालिकेच्या क्रीडांगणाजवळ त्यांनी रिक्षा वळवली असताना समोरून येणाऱ्या दुचाकीस्वाराशी त्यांचा वाद झाला. सुरुवातीला हा वाद किरकोळ स्वरूपाचा होता, मात्र काही क्षणांतच परिस्थिती तणावपूर्ण झाली आणि दोन्ही बाजूंमध्ये बाचाबाची




सुरू झाली. या वादानंतर संतापलेल्या आरोपींनी रिक्षा चालकाला लक्ष्य करत देशी बनावटीच्या पिस्तुलातून गोळीबार केला. तसेच त्यांना तीक्ष्ण शस्त्रांचा धाक दाखवत जीवे मारण्याची धमकी दिल्याचा आरोप आहे. भररस्त्यात झालेल्या या प्रकारामुळे परिसरात एकच खळबळ उडाली आणि नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले.

घटनेची माहिती मिळताच पोलीस उपायुक्त राजलक्ष्मी शिवणकर आणि इतर वरिष्ठ अधिकाऱ्यांनी घटनास्थळी धाव घेतली. पोलिसांनी परिसरातील सीसीटीव्ही फुटेज आणि तांत्रिक तपासाच्या आधारे आरोपींचा माग काढला. त्यानंतर कुणाल उर्फ नन्या जाधव, आदित्य घावरे, अक्षय जावळे आणि शिवाजी मरगळे या चौघांना अटक करण्यात आली.

पोलिसांच्या प्राथमिक तपासात हा वाद अचानक झालेल्या रस्त्यावरच्या भांडणातून वाढल्याचे समोर आले आहे. मात्र आरोपींनी थेट पिस्तूल काढून गोळीबार केल्याने या प्रकरणाचे गांभीर्य वाढले आहे. या टोळक्यातील इतर साथीदारांचा शोधही पोलिसांकडून सुरू आहे.

दरम्यान, भररस्त्यात अशा प्रकारे गोळीबार झाल्याने कोंढवा परिसरातील नागरिक आणि वाहनचालकांमध्ये असुरक्षिततेची भावना निर्माण झाली आहे. या प्रकरणाचा पुढील तपास कोंढवा पोलीस करत असून आरोपींकडून शस्त्रांचा स्रोत आणि या घटनेमागील नेमका हेतू जाणून घेण्याचा प्रयत्न सुरू आहे.

# सभापती युवराज काकडे यांची कुंजीरवाडी प्राथमिक आरोग्य केंद्राला अचानक भेट

**लोणी काळभोर, ता. ११ :** हवेली पंचायत समितीच्या सभापतीपदाची सूत्रे हाती घेतल्यानंतर कामाचा धडाका सुरू ठेवत सभापती युवराज हिरामण काकडे यांनी कुंजीरवाडी येथील प्राथमिक आरोग्य केंद्राला बुधवारी (ता. ११) अचानक भेट देत आरोग्य सेवांचा आढावा घेतला. या अचानक पाहणीमुळे आरोग्य केंद्रात एकच खळबळ उडाली.

सभापती काकडे यांनी आरोग्य केंद्रातील विविध विभागांची प्रत्यक्ष पाहणी करून वैद्यकीय अधिकारी आणि कर्मचाऱ्यांशी संवाद साधला. रुग्णांना वेळेवर उपचार मिळत आहेत का, औषधसाठा पुरेसा आहे का, स्वच्छतेची व्यवस्था कशी आहे



तसेच महिला प्रसूतीगृहातील सुविधा याबाबत त्यांनी सविस्तर माहिती घेतली. रुग्णांना कोणत्याही प्रकारचा त्रास होऊ नये आणि उपचार प्रक्रिया सुरळीत चालावी यासाठी त्यांनी आरोग्य विभागाला आवश्यक त्या तातडीच्या सूचना दिल्या.

यावेळी बोलताना सभापती युवराज काकडे यांनी हवेली तालुक्यातील सर्व आरोग्य यंत्रणांवर लक्ष ठेवणार असल्याचे स्पष्ट केले. हवेली तालुक्यातील ७१ गावांमधील प्राथमिक आरोग्य केंद्रे, उपकेंद्रे, अंगणवाड्या तसेच शाळांना अचानक भेटी देऊन तेथील समस्या प्रत्यक्ष पाहणार असल्याचे त्यांनी सांगितले. स्थानिक पातळीवरील अडचणी जाणून घेऊन पंचायत समितीच्या माध्यमातून त्या सोडवण्यासाठी आवश्यक ती कार्यवाही करण्यात येईल, असेही त्यांनी नमूद केले. ग्रामीण भागातील नागरिकांना दर्जेदार आणि वेळेवर आरोग्य सेवा मिळणे ही प्रशासनाची जबाबदारी असल्याचेही त्यांनी यावेळी स्पष्ट केले.

या पाहणीवेळी युवा नेते संदेश आव्हाळे, पंचायत समिती सदस्य कृषीराज चौधरी, माजी सरपंच संतोष दादा कुंजीर, माजी उपसरपंच भरत निगडे, संतोष कुंजीर, पोलीस पाटील मिलिंद कुंजीर, माजी तंटामुक्ती अध्यक्ष अमर कुंजीर, विकास निगडे, चंद्रकांत बारवकर, संजय झेंडे आदी उपस्थित होते. तसेच वैद्यकीय अधिकारी डॉक्टर लोखंडे आणि कर्मचारी वर्गही यावेळी उपस्थित होता.

दरम्यान, सभापतींच्या या अचानक पाहणीमुळे आरोग्य यंत्रणा अधिक कार्यक्षम करण्यासाठी प्रशासनात हालचाल सुरू झाली असून ग्रामीण भागातील नागरिकांना दर्जेदार आरोग्य सुविधा मिळण्यासाठी सकारात्मक पाऊल उचलले जात असल्याची प्रतिक्रिया नागरिकांकडून व्यक्त करण्यात येत आहे.

# अल्पवयीन मुलीवरील अत्याचार प्रकरणी आरोपीला २० वर्ष सक्तमजुरी

**पुणे, ता. ११ :** जिल्ह्यातील पौड पोलीस ठाण्यात दाखल असलेल्या अल्पवयीन मुलीवरील लैंगिक अत्याचार प्रकरणात शिवाजीनगर येथील जिल्हा व सत्र न्यायालयाने आरोपीला कठोर शिक्षा सुनावली आहे. या प्रकरणाचा निकाल १० मार्च २०२६ रोजी मा. जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायाधीश एस. आर. साळुंखे यांच्या न्यायालयात जाहीर करण्यात आला. न्यायालयाने आरोपी अमोल भीमराव साळवे (वय ३८, रा. राशीन, ता. कर्जत, जि. अहिल्यानगर) याला दोषी ठरवत विविध कलमांखाली दीर्घकालीन सक्तमजुरीची शिक्षा सुनावली.

पौड पोलीस ठाण्यात गुन्हा रजि. क्र. २८२/२०२२ अन्वये भारतीय दंड संहितेच्या कलम ३७६(२)(f)(j)(l), ५०६ तसेच पॉक्सो कायद्याच्या विविध कलमांखाली हा गुन्हा दाखल करण्यात आला होता. तपासानंतर या प्रकरणाची सुनावणी विशेष पॉक्सो प्रकरण क्रमांक ७४८/२०२२ म्हणून शिवाजीनगर सत्र न्यायालयात सुरू होती. सरकारी पक्षातर्फे सरकारी अभियोक्ता ॲड. अनिलकुमार वर्मा यांनी न्यायालयात पुरावे आणि साक्षीदारांच्या आधारे युक्तिवाद मांडला.

सुनावणीनंतर न्यायालयाने आरोपीला भारतीय दंड संहितेच्या कलम ३७६(२)(f)(j)(l) अंतर्गत १० वर्ष सक्तमजुरी आणि १००० रुपये दंडाची शिक्षा सुनावली. तसेच कलम ५०६ अंतर्गत ७ वर्ष सक्तमजुरी व १००० रुपये दंड ठोठावण्यात आला. पॉक्सो कायद्यांतर्गत कलम ३ सह ४ अंतर्गत १० वर्ष सक्तमजुरी व १००० रुपये दंडाची शिक्षा देण्यात आली आहे. याशिवाय कलम ५(j)(ii) सह ६ अंतर्गत सर्वात



कठोर अशी २० वर्ष सक्तमजुरी आणि ५००० रुपये दंड ठोठावण्यात आला.

तसेच पॉक्सो कायद्याच्या कलम ७ सह ८ अंतर्गत ५ वर्ष सक्तमजुरी व १००० रुपये दंड, तर कलम ९(k)(l) सह १० अंतर्गत ७ वर्ष सक्तमजुरी व १००० रुपये दंड अशी शिक्षा देखील न्यायालयाने सुनावली आहे. या शिक्षांमुळे आरोपीला दीर्घकाल कारावास भोगावा लागणार आहे.

या प्रकरणाचा तपास त्या वेळी पौड पोलीस ठाण्यात कार्यरत असलेले सहाय्यक पोलीस निरीक्षक पवन चौधरी यांनी केला होता. सध्या ते रत्नागिरी येथे कार्यरत आहेत. या प्रकरणात वरिष्ठ पोलीस निरीक्षक संतोष गिरीगोसावी यांच्या मार्गदर्शनाखाली तपासाची कार्यवाही पार पडली. न्यायालयीन कामकाजासाठी पोलीस कर्मचारी तसेच संबंधित अधिकाऱ्यांनीही पाठपुरावा केला.

दरम्यान, अल्पवयीनांवरील अत्याचाराच्या गुन्ह्यांमध्ये न्यायालयाकडून कठोर भूमिका घेतली जात असल्याचे या निकालातून पुन्हा स्पष्ट झाले आहे. पॉक्सो कायद्यांतर्गत अशा गुन्ह्यांवर कठोर शिक्षा देऊन समाजात प्रतिबंधात्मक संदेश देण्याचा प्रयत्न न्यायव्यवस्थेकडून सातत्याने केला जात असल्याचे कायदेतज्ज्ञांचे मत आहे.

# पिंपरी चिंचवडमध्ये घरफोडी करणारी महिला अटकेत; आठ लाखांचे सोन्याचे दागिने जप्त

**पिंपरी चिंचवड, ता. ११ :** पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयाच्या गुन्हे शाखेने दिवसाढवळ्या घरफोडी करणाऱ्या एका महिलेला अटक केली आहे. तिच्याकडून सुमारे ८ लाख रुपयांचे सोन्याचे दागिने जप्त करण्यात आले आहेत. या कारवाईमुळे सांगवी पोलीस ठाण्यात नोंदवलेल्या दोन घरफोडीच्या गुन्ह्यांची उकल झाल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे.

अटक करण्यात आलेल्या महिलेचे नाव सुमन दत्ता लोंढे (वय - ३५) असून ती पुणे शहरातील वारजे माळवाडी परिसरातील रामनगर येथे राहते. सांगवी परिसरात २५ फेब्रुवारी २०२६ रोजी घरफोडीचा गुन्हा नोंदवण्यात आला होता. या प्रकरणाचा तपास करत असताना पोलिसांनी




संशयित महिलेचा शोध घेत तिला ताब्यात घेतले.

पोलिसांच्या माहितीनुसार, सांगवी परिसरातील एका घरातून सुमारे ५ लाख रुपयांचे सोन्याचे दागिने चोरीला गेल्याची तक्रार दाखल करण्यात आली होती. या प्रकरणाचा तपास करताना गुन्हे शाखा युनिट १ च्या पथकाने सांगवी ते वारजे माळवाडी परिसरातील २०० पेक्षा जास्त सीसीटीव्ही कॅमेऱ्यांचे फुटेज तपासले. या फुटेजच्या आधारे संशयित महिलेची ओळख पटवण्यात पोलिसांना यश आले. तांत्रिक तपास आणि गोपनीय माहितीच्या आधारे पोलिसांनी सुमन लोंढे हिला ताब्यात घेऊन चौकशी केली. चौकशीदरम्यान तिने ऑक्टोबर २०२५ मध्ये सांगवी परिसरात दिवसाढवळ्या घरफोडी केल्याची कबुली दिल्याचे पोलिसांनी सांगितले. या कबुलीच्या आधारे दोन घरफोडीचे गुन्हे उघडकीस आले.

पोलिसांनी आरोपीकडून सुमारे ८ लाख रुपयांचे सोन्याचे दागिने जप्त केले आहेत. तपासादरम्यान आरोपी महिला घरांच्या बाहेर चाव्या लपवून ठेवण्याची सवय असलेल्या घरांना लक्ष्य करत असल्याचे समोर आले. ती दाराजवळ किंवा बुटांच्या रॅकमध्ये ठेवलेल्या चाव्या शोधून घरात प्रवेश करत असल्याची माहिती पोलिसांनी दिली. ही कारवाई पिंपरी चिंचवडचे पोलीस आयुक्त विनय कुमार चौबे, सहपोलीस आयुक्त डॉ. शशिकांत महावरकर, अतिरिक्त पोलीस आयुक्त सारंग आवाड आणि पोलिस उपायुक्त डॉ. शिवाजी पवार यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. वरिष्ठ पोलीस निरीक्षक नरेंद्र ठाकरे यांच्या नेतृत्वाखाली गुन्हे शाखा युनिट १ च्या पथकाने ही कारवाई केली असून या प्रकरणाचा पुढील तपास सुरू आहे.




Printed & Published By Janardan Gowardhan Dandge on behalf of Pune Prime News Network and printed at SHREE SAMARTH PRINTERS, 686, SHIVGANGA CHAMBERS, SHOP NO. G1, BUDHWAR PETH PUNE, 411002, Maharashtra. and publishded at Shop no 201, Sunrise Complex, Pune-Solapur Road. loni kalbhor(station), Tal.: Haveli Dist.: Pune-412201 Maharashtra) Editor- Janardhan Dandge (Mo. No. 9922232222).

मुद्रक, प्रकाशक व संपादक : जनार्दन गोवर्धन दांडगे. हे दैनिक पुणे प्राईम न्यूज नेटवर्क करीता मुद्रक आणि प्रकाशक जनार्दन गोवर्धन दांडगे यांनी श्री स्वामी समर्थ प्रिंटर्स, ६८६, शिवगंगा चेंबर्स, शॉप नं. जी १, बुधवार पेठ, पुणे - ४११००२ महाराष्ट्र येथे मुद्रित केले व पुणे प्राईम न्यूज नेटवर्क, शॉप नं २०१, सनराईज कॉम्प्लेक्स, पुणे सोलापूर रोड, लोणी काळभोर (स्टेशन), ता. हवेली, जि. पुणे- ४१२२०१ येथे प्रकाशित केले. 'पुणे प्राईम न्यूज' मधील लेखांचे हक्क राखून ठेवले आहेत. पुणे प्राईम न्यूज हे 'पुणे प्राईम न्यूज नेटवर्क'चे व्यापारचिन्ह आहे. (पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी), दूरध्वनी : ९९२२२३२२२२, E Mail: puneprimenewsgmail.com.

प्राईम लाईफ



## तुमचा गुळ शुद्ध आहे का? भेसळ शोधण्यासाठी FSSI शेअर केली आहे घरगुती चाचणी

भारतीय घरांमध्ये वर्षभर गूळ हा मोठ्या प्रमाणात वापरला जाणारा घटक आहे. पारंपारिक मिष्टान्न गोड करण्यापासून ते आयुर्वेदिक पेयांपर्यंत उपयुक्त आहे. मात्र गुळामध्ये देखील भेसळीचे प्रकार वाढले आहेत. भेसळयुक्त गुळामध्ये अनेकदा साखर, पावडर किंवा बेकिंग सोडा सारख्या पदार्थ मिसळले जातात ज्यामुळे त्याची शुद्धता कमी होते आणि त्याची गुणवत्ता धोक्यात येते. ग्राहकांना जागरूक राहण्यास मदत करण्यासाठी, हिंदुस्थानातील अन्न सुरक्षा आणि मानक प्राधिकरण ने भेसळ शोधण्यासाठी एक साधी घरगुती पद्धत शेअर केली आहे.

गुळात बेकिंग सोडा शोधण्यासाठी सोपी चाचणी शेअर केली आहे यामध्ये भेसळ शोधण्यासाठी घरी कोणीही ही चाचणी करू शकते. यासाठी १/४ चमचा कुस्करलेला गूळ एका टेस्ट ट्यूब किंवा लहान ग्लासमध्ये घ्या. नमुन्यात  मिली हायड्रोक्लोरिक ॲसिड घाला. प्रतिक्रियेचे निरीक्षण करा. जर गुळावर बुडबुडे आले तर गुळ अशुद्ध आहे. जेव्हा गुळात सोडियम बायकार्बोनेट असते, तेव्हा ते हायड्रोक्लोरिक ॲसिडशी प्रतिक्रिया देऊन कार्बन डायऑक्साइड वायू सोडते, ज्यामुळे बुडबुडे तयार होतात. भेसळयुक्त गुळाचे सेवन केल्याने पचन, रोगप्रतिकारक शक्ती कमी होणे आणि शरीरातील ऊर्जा पातळी कमी होणे यांसारख्या समस्या होतात .

गुळ खरेदी करताना शुद्ध गुळ कसा शोधावा जाणुन घ्या

पॅकेज केलेला गूळ खरेदी करण्यापूर्वी FSSI परवाना क्रमांक तपासा.

जास्त तेजस्वी किंवा चमकदार गुळाचे ब्लॉक टाळा, कारण हे कृत्रिम रंग किंवा ॲडिटीव्हचा वापर दर्शवू शकतात.

गुणवत्तेसाठी ओळखले जाणारे विश्वसनीय ब्रँड किंवा विश्वसनीय विक्रेते निवडा.

गडद गुळ निवडा जो बहुतेकदा कमी प्रक्रिया केलेला असतो.

असामान्यपणे स्वस्त गूळ टाळा, कारण कमी किमती भेसळीचे संकेत देऊ शकतात.

भेसळीचा संशय आल्यास काय करावे जर तुम्हाला संशयास्पद गुळ आढळला तर तुम्ही त्याची थेट तक्रार करू शकता: ऋडड्ख चे ऑनलाइन तक्रार पोर्टल FSSI मोबाइल ॲप स्थानिक अन्न सुरक्षा विभाग अशा प्रकरणांची तक्रार केल्याने अधिकाऱ्यांना कठोर कारवाई करण्यास आणि सर्व ग्राहकांसाठी अन्न सुरक्षा राखण्यास मदत होते.

सोप्या तपासण्या आणि जागरूक निवडींसह, तुम्ही तुमचा गुळ जितका अस्सल असावा तितकाच खरा आहे याची खात्री करू शकता.

# समाजभूषण गणपतराव काळभोर महाविद्यालयात महाराष्ट्र अर्थसंकल्पावर मार्गदर्शन

**लोणी काळभोर, ता. ११ :** महाराष्ट्र सरकारने २०२६-२७ या आर्थिक वर्षासाठी सुमारे ७ लाख ६९ हजार ४६७ कोटी रुपयांचा विक्रमी अर्थसंकल्प सादर करत राज्याच्या सर्वांगीण विकासाचा रोडमॅप मांडला आहे. या अर्थसंकल्पात शेतकरी, महिला सक्षमीकरण आणि पायाभूत सुविधा विकासावर विशेष भर देण्यात आला असून २०४७ पर्यंत महाराष्ट्राची अर्थव्यवस्था पाच ट्रिलियन डॉलरपर्यंत पोहोचविण्याचे महत्त्वाकांक्षी उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे, असे प्रतिपादन प्रा. प्रदीप लक्ष्मण मेंढापुरे यांनी केले.

लोणी काळभोर (ता. हवेली) येथील समाजभूषण गणपतराव काळभोर महाविद्यालयाच्या अर्थशास्त्र विभागाच्या वतीने महाराष्ट्राचा अर्थसंकल्प २०२६-२७ या विषयावर मंगळवारी (ता. १०) विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या प्रारंभी महाराष्ट्राचा अर्थसंकल्प २०२६-२७ या विषयावरील भित्तीपत्रिकेचे उद्घाटन प्रा. मेंढापुरे यांच्या हस्ते करण्यात आले.

खंडाळा (जि. सातारा) येथील सुशिला शंकरराव गाढवे महाविद्यालयाचे प्रा. प्रदीप लक्ष्मण मेंढापुरे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना अर्थसंकल्पातील महत्त्वाच्या तरतुदींचा सविस्तर उहापोह केला. संतुलित विकासासाठी प्रगतीशील, शाश्वत, सर्वसमावेशक आणि सुशासन या चार स्तंभांवर आधारित व्हिजन मॅनेजमेंट युनिट स्थापन करण्यात येणार असल्याची माहिती त्यांनी दिली. तसेच पर्यटन क्षेत्रातील गुंतवणूक वाढविण्यासाठी मुंबई, सिंगापूर आणि दुबई येथे पर्यटन गुंतवणूक कक्ष उभारण्याची योजनाही सरकारने आखल्याचे त्यांनी सांगितले.



पुढे बोलताना त्यांनी सांगितले की, पुणे मेट्रोच्या दुसऱ्या टप्प्यात हडपसर ते लोणी काळभोर मेट्रो मार्गिकेला मिळालेली मान्यता ही ग्रामीण भागासाठी विकासाची नवी संधी ठरणार आहे. पायाभूत सुविधांसाठी अर्थसंकल्पात मोठी तरतूद केल्यामुळे राज्याची प्रगती अधिक वेगाने होईल आणि भविष्यात महाराष्ट्र विकसित व प्रगत अर्थव्यवस्था म्हणून देशात ओळख निर्माण करेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अंबादास मंजुळकर होते. अध्यक्षीय मनोगत व्यक्त करताना ते म्हणाले की, अर्थसंकल्प हा केवळ राज्याचा आर्थिक दस्तऐवज नसून प्रत्येक कुटुंबाच्या आर्थिक नियोजनाशीही संबंधित असतो. या अर्थसंकल्पात रोजगारनिर्मिती, पायाभूत सुविधा, शेतकरी व महिला यांना प्राधान्य दिले असले तरी उच्च शिक्षण व संशोधनासाठी अपेक्षित निधीची तरतूद अधिक असायला हवी होती, असे त्यांनी नमूद केले. दरम्यान, या व्याख्यानाद्वारे विद्यार्थ्यांना राज्याच्या आर्थिक धोरणांची सखोल माहिती देत अर्थसंकल्पातील विविध महत्त्वाच्या बाबींचा उहापोह करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व पाहुण्यांचा परिचय डॉ. शेखर पाटील यांनी करून दिला, तर सूत्रसंचालन व आभार प्रा. गणेश गाडेकर यांनी मानले. यावेळी अर्थसंकल्प विषयावरील भित्तीपत्रिका तयार करणाऱ्या विद्यार्थिनी महिदा सय्यद व जान्हवी पवार यांचा विशेष सत्कार करण्यात आला. कार्यक्रमास अर्थशास्त्र विभागाचे विद्यार्थी व प्राध्यापक उपस्थित होते.


## गॅस सिलेंडरच्या टाकीने ठेचून एकाचा खून

**पिंपरी, ता. ११ :** मोशी येथील एका बांधकाम प्रकल्पावर जेवण बनविण्याच्या कारणावरून झालेल्या वादातून एका कामगाराचा गॅस सिलेंडरच्या टाकीने ठेचून खून करण्यात आला. ही घटना सोमवारी (९ मार्च) कुदळे वस्ती येथील लेबर कॅम्पमध्ये घडली.

बालाजी मारोती रेड्डी खंदाडे (२९, हंगरगा, मुखेड, नांदेड) असे खून झालेल्या कामगाराचे नाव आहे. या प्रकरणात अनिकेत विनायक भुरे (२१, भालचंद्र उपवन सोसायटी, पुनावळे, पुणे; मूळ पत्ता: समुद्राळ, उमरगा, धाराशिव) यांनी एमआयडीसी भोसरी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. पोलिसांनी प्रदीप विठ्ठल गुंडरे (३१, दक्षिण लक्ष्मीनगर, मोशी, पुणे; मूळ पत्ता: आंदोरी, अहमदपूर, लातूर) या आरोपीला अटक केली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, मृत युवक आणि आरोपी हे नातेवाईक असून दोघेही हवालदार वस्ती येथील एका बांधकाम प्रकल्पावर मजूर म्हणून काम करत होते. त्याच ठिकाणी ते राहत होते.

# सेवानिवृत्त पोलिसांना मुंबईत हक्काची घरे द्या आणि भरतीसाठी येणाऱ्या तरुणांची परवड थांबवा

### आदित्य ठाकरे यांचे मुख्यमंत्र्यांना पत्र



**मुंबई, ता. ११ :** सेवानिवृत्त पोलिसांना मुंबईत हक्काची घरे द्या आणि भरतीसाठी येणाऱ्या तरुणांची परवड थांबवा, अशी मागणी शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) नेते, युवासेनाप्रमुख, आमदार आदित्य ठाकरे यांनी केली आहे. या संदर्भात आदित्य ठाकरे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्रही लिहिले आहे. आदित्य ठाकरे यांनी आपल्या एक्स अकाऊंटवर पोस्ट करत याबाबत माहिती दिली.

सेवानिवृत्त पोलीस कर्मचाऱ्यांना मुंबईमध्ये हक्काची घरे उपलब्ध करून देण्यासंदर्भात यापूर्वी आपल्या सोबत बैठक पार पडली होती. या बैठकीत पोलीस पत्नी प्रतिनिधी देखील उपस्थित होते. सदर बैठकीत या विषयावर चर्चा झाली, तथापि सेवानिवृत्त पोलीस परिवारांना घरे उपलब्ध करून देण्याबाबत सरकारची भूमिका सकारात्मक नव्हती, तरी या संवेदनशील विषयाकडे आपले लक्ष आहे, याची मला जाणीव आहे.

९ मार्च २०२६ रोजी गृह राज्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत सेवानिवृत्त पोलीस कर्मचाऱ्यांच्या घरांच्या प्रश्नाबाबत चर्चा करण्यात आली आल्याचे समजते. तरी या संदर्भात भविष्यात होणाऱ्या बैठकीमध्ये आम्हा लोकप्रतिनिधींनाही सहभागी करून घेण्यात यावे, जेणेकरून सेवानिवृत्त तसेच सेवेत असलेल्या पोलीस कर्मचाऱ्यांच्या घरांच्या प्रश्नांबाबत सविस्तर चर्चा करता येईल.

त्याचप्रमाणे, सेवानिवृत्त मुंबई पोलीस अधिकारी किंवा अंमलदार व त्यांच्या कुटुंबियांवर लादण्यात येणारे दंडणीय शुल्क हा कमी आणि माफक करण्यात यावा, ही विनंती. तसेच पोलीस दलात भरतीसाठी तयारी करत असलेल्या युवा-युवतींना त्या-त्या शहरांमध्ये पोलीस दलात भरतीच्या कालावधीत योग्य निवास व्यवस्था उपलब्ध करून देण्याबाबत आवश्यक ती कार्यवाही करावी, जेणेकरून त्यांना उड्डाणपुलाखाली किंवा रस्त्यावर झोपण्याची वेळ येणार नाही, ही विनंती, असे पत्र आदित्य ठाकरे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पाठवले आहे.



## टीम इंडियाला तब्बल १३१ कोटी रुपयांचे रोख बक्षीस

**मुंबई, ता. ११ :** भारतीय क्रिकेटच्या धुरंधरांनी पुन्हा एकदा जगाच्या क्रिकेट नकाशावर आपला झेंडा रोवला आणि त्या पराक्रमाला सलाम करत बीसीसीआयने अक्षरशः पैशांचा पाऊस पाडण्याची घोषणा केली आहे. टी-२० विश्वचषक जिंकून इतिहास घडवणाऱ्या या जगजेत्या संघावर तब्बल १३१ कोटी रुपयांच्या रोख बक्षिसांचा वर्षाव होणार असून बीसीसीआयने आज ही मोठी घोषणा करत विजयाचा आनंद द्विगुणित केला.

हिंदुस्थानी संघाने २०२४ मध्ये टी-२० विश्वचषकावर नाव कोरत १३ वर्षांचा दुष्काळ संपवला होता. त्यानंतर जेतेपद राखण्याचे आव्हान होते. मात्र जिंकणे सवय बनली की इतिहास घडतो या म्हणीप्रमाणे हिंदुस्थानी संघाने पुन्हा जग जिंकत तिसरे टी-२० विश्वविजेतेपद पटकावले. या यशाचा सन्मान म्हणून बीसीसीआयने २०२४ मध्ये दिलेल्या १२५ कोटींच्या बक्षिसात ६ कोटींची भर घालत १३१ कोटींचा मानाचा मुजरा केला.




## पुणे-सोलापूर महामार्गावर मोटारसायकलींची धडक; दोन्ही चालक गंभीर जखमी

**इंदापूर, ता. ११ :** पुणे-सोलापूर महामार्गावर बुधवारी इंदापूर तालुक्यातील गलांडवाडी नजीक दोन मोटारसायकलींचा भीषण अपघात झाला. या अपघातात दोन्ही मोटारसायकल चालक गंभीर जखमी झाले असून त्यांना तातडीने उपचारासाठी स्थानिक रुग्णालयात दाखल करण्यात आले.

अपघातानंतर परिसरातील नागरिकांनी त्वरीत मदत केली आणि जखमींना म्बुलन्सद्वारे जवळच्या रुग्णालयात पाठवले. यावेळी घटनास्थळी महाराष्ट्र सुरक्षा बलाचे अधिकारी तातडीने दाखल झाले आणि पुढील मदतकार्य सुरु ठेवले.

स्थानिक पोलिसांनी अपघाताची तपासणी सुरु केली असून, महामार्गावर वाहनचालकांनी सुरक्षित अंतर राखणे आणि काळजी घेण्याचे आवाहन केले आहे. अपघाताची अधिक माहिती अद्याप समोर आलेली नाही.

# नसरापूर येथे जिल्हा परिषद शाळेच्या समोर मारहाणीची घटना

### ग्रामस्थांकडून कठोर कारवाईची मागणी

**विशाल शिंदे**

नसरापूर, ता. ११ : येथील जिल्हा परिषद शाळेच्या परिसरात घडलेल्या मारहाणीच्या घटनेमुळे गावात संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे. या घटनेनंतर संबंधित व्यक्तीवर कठोर कारवाई करण्याची मागणी ग्रामस्थांनी पोलीस प्रशासनाकडे केली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, नसरापूर येथील रहिवासी किशोर चंद्रकांत पवार (वय ३२) हे आपल्या भाचा रुद्र याला शाळेत सोडण्यासाठी सकाळच्या सुमारास जिल्हा परिषद शाळेत गेले होते. त्यावेळी शाळेच्या कार्यालयीन कक्षाजवळ मंगेश हणुमंत शिंदे (रा. नायगाव, ता. भोर) याच्याशी त्यांची बाचाबाची झाली.




आपल्या भाच्याला शिवीगाळ का केली, अशी विचारणा केल्याने आरोपी संतापला. यावेळी आरोपीने काठीने मारहाण करत फिर्यादीच्या डाव्या खांद्यावर चावा घेतल्याची माहिती समोर आली आहे. तसेच शिवीगाळ व दमदाटीही करण्यात आल्याचे सांगितले जात आहे.

शाळेसारख्या संवेदनशील ठिकाणी घडलेल्या या घटनेमुळे पालक व ग्रामस्थांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. स्थानिकांच्या म्हणण्यानुसार, संबंधित व्यक्ती यापूर्वीही गावातील नागरिकांना त्रास देत असल्याच्या तक्रारी आहेत. तसेच तो यापूर्वी कारागृहात जाऊन आल्याचीही चर्चा गावात आहे.

दरम्यान, या प्रकाराला कंटाळलेल्या ग्रामस्थांनी पोलीस प्रशासनाने संबंधित व्यक्तीवर कठोर कारवाई करून कायमस्वरूपी बंदोबस्त करावा, अशी मागणी केली आहे. या घटनेमुळे परिसरात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले असून पुढील कारवाईकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.

# बारामतीतील कंपनीच्या गोदाममधून तीन लाखांच्या इलेक्ट्रिक वस्तू चोरीला

**बारामती, ता. ११ :** शहरातील एका खासगी कंपनीच्या गोदामातून तब्बल ३ लाख २५ हजार रुपयांचा इलेक्ट्रिकल साहित्य चोरीला गेल्याची घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणी बारामती शहर पोलीस ठाण्यात दोन जणांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे

याबाबत पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, लक्ष्मण अंकुश वीर (वय ३२) यांनी याबाबत तक्रार दिली आहे. ते बारामतीतील माया फिक्स प्रायव्हेट लिमिटेड या कंपनीमध्ये मॅनेजर म्हणून कार्यरत आहेत. कंपनीच्या गोदामात ठेवलेला मोठ्या प्रमाणातील इलेक्ट्रिकल साहित्य चोरीला गेल्याचे त्यांच्या निदर्शनास आले.

तक्रारीनुसार, १५ जानेवारी २०२६ ते २ मार्च २०२६ या कालावधीत कंपनीच्या गोदामातील




साहित्य चोरी करण्यात आले. २ मार्च रोजी दुपारी सुमारे १२ वाजण्याच्या सुमारास पार्किंग सिक्युरिटीच्या माध्यमातून कंपनीच्या कार्यालयात चोरी झाल्याची माहिती मिळाली. त्यानंतर कंपनीच्या मालकांना याची माहिती देण्यात आली. पुढील तपासात गोदामातील विविध इलेक्ट्रिकल साहित्य गायब असल्याचे स्पष्ट झाले.

या चोरीमध्ये अंदाजे ५० हजार रुपये किमतीची कॉपर केबल, १ लाख रुपये किमतीची १०० मीटर इलेक्ट्रिकल केबल, १ लाख २५ हजार रुपये किमतीचे स्ट्रीट लाईट, तसेच ५० हजार रुपये किमतीचे चार कोअर आर्मर्ड केबल (२०० मीटर) असा एकूण ३ लाख २५ हजार रुपयांचा माल चोरीला गेल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे.

या प्रकरणी मोहित कुमार राम नरेश कुमार तसेच त्याचे दोन साथीदार यांच्यावर संशय व्यक्त करण्यात आला आहे. दोघेही उत्तरप्रदेश येथील रहिवासी असल्याचे सांगण्यात आले आहे. या घटनेप्रकरणी बारामती शहर पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता २०२३ च्या कलम ३०३(२) व ३(५) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलीस हेड कॉन्स्टेबल राजश्री बापूराव अटोळे करत आहेत. पोलीसांकडून आरोपींचा शोध घेण्याचे काम सुरू असून याचा तपास केला जात आहे.

# सुनेच्या मानसिक त्रासाला कंटाळून वृद्धाची आत्महत्या

### बार्शी शहर पोलीस ठाण्यात सुनेविरुद्ध गुन्हा दाखल

**बार्शी, ता. ११ :** कौटुंबिक वाद आणि मानसिक त्रासामुळे एका वृद्धाने टोकाचे पाऊल उचलल्याची हृदयद्रावक घटना सोलापूर जिल्ह्यातील बार्शी येथे घडली आहे. सततच्या मनस्तापाला कंटाळून ७३ वर्षीय वृद्धाने विषारी द्रव्य प्राशन करून आत्महत्या केल्याची घटना उघडकीस आली असून या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

सर्जेराव शंकरराव नायकुडे (वय-७३) असे आत्महत्या केलेल्या वृद्धाचे नाव आहे. मंगळवारी सकाळी बार्शी शहरातील उपळाई रोड परिसरातील नाईकवाडी प्लॉट येथे ही घटना घडली. याप्रकरणी मृताचे मुलगा महेश नायकुडे (वय ४१) यांनी बार्शी शहर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार आत्महत्येस प्रवृत्त केल्याच्या आरोपावरून उमेश



नायकुडे याची पत्नी सारिका उमेश नायकुडे (रा. कुर्डुवाडी रोड, बार्शी) हिच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, सर्जेराव नायकुडे आणि त्यांचा मुलगा महेश हे बार्शीतील नाईकवाडी प्लॉट येथील स्वतःच्या बंगल्यात राहत होते. तर महेशचा भाऊ उमेश आणि त्याची पत्नी सारिका हे काही महिन्यांपासून कुर्डुवाडी रोड परिसरात स्वतंत्र राहत होते.

दरम्यान, गेल्या काही महिन्यांपासून सर्जेराव नायकुडे हे उमेश यांच्या घरी राहायला गेले होते. त्या काळात किरकोळ कारणांवरून सून सारिका त्यांना वारंवार अपमानित करत असल्याचा आरोप फिर्यादीत करण्यात आला आहे. या प्रकारामुळे सर्जेराव नायकुडे मानसिक तणावात असल्याचेही सांगण्यात आले आहे.

सततच्या मनस्तापाला कंटाळून ते पुन्हा नाईकवाडी प्लॉट येथील घरी आले. मात्र मानसिक तणावातून त्यांनी १० मार्च रोजी विषारी द्रव्य प्राशन करून आत्महत्या केल्याचे समोर आले आहे. या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली असून गावकऱ्यांकडून हळहळ व्यक्त केली जात आहे. पुढील तपास बार्शी शहर पोलीस करत आहेत.

# रोहित टिळकांचा शिवसेना प्रवेश; कसब्यातील राजकारणाला नवे वळण; धंगेकरांसमोर नवे आव्हान?

**पुणे, ता. ११ :** लोकमान्य टिळकांचे खापरपणतू रोहित टिळक यांनी काँग्रेस पक्षाला रामराम करत शिवसेना (शिंदे गट) मध्ये प्रवेश करण्याचा निर्णय घेतल्याने कसबा विधानसभा मतदारसंघातील राजकीय समीकरणे बदलण्याची चर्चा सुरू झाली आहे. या निर्णयामुळे माजी आमदार रवींद्र धंगेकर यांच्या समोर नवे राजकीय आव्हान उभे राहू शकते, अशी चर्चा राजकीय वर्तुळात रंगू लागली आहे.

रोहित टिळक यांनी काँग्रेस सोडण्याचा निर्णय घेतल्यानंतर त्यांचा शिवसेना मध्ये प्रवेश जवळपास निश्चित मानला जात आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना लोकमान्य टिळक पुरस्कार देण्यात आल्यापासून काँग्रेस नेतृत्व आणि टिळक यांच्यातील मतभेद वाढल्याची चर्चा होती. त्यानंतर राज्यसभेच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवरही टिळक आणि काँग्रेस हायकमांड यांच्यातील दुरावा वाढत गेला. अखेर त्यांनी शिवसेनेत प्रवेश करण्याचा निर्णय घेतल्याने कसबा मतदारसंघातील राजकीय समीकरणे पुन्हा बदलण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

रवींद्र धंगेकर यांनी काँग्रेसकडून लोकसभा निवडणूक लढवत केंद्रीय राज्यमंत्री यांच्याविरोधात जोरदार लढत दिली होती. मात्र त्यांना पराभव स्वीकारावा लागला. त्यानंतर झालेल्या विधानसभा निवडणुकीत भाजपचे हेमंत रासने यांनी त्यांचा पराभव केला. काँग्रेसमधील अंतर्गत



मतभेदांनंतर धंगेकर यांनी शिवसेनेत प्रवेश करून पुणे महानगरप्रमुख पद स्वीकारले. पुढे महापालिका निवडणुकीत त्यांनी पत्नी प्रतिभा धंगेकर आणि पुत्र प्रणव धंगेकर यांना निवडणूक रिंगणात उतरवले; मात्र दोघांनाही पराभव पत्करावा लागला.

दरम्यान, कोथरूडमधील गुन्हेगारी आणि जैन बोर्डिंग प्रकरणावरून धंगेकर यांनी केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, तसेच उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांच्यावर सातत्याने टीका केली होती. आता रोहित टिळक यांच्या संभाव्य शिवसेना प्रवेशामुळे कसबा मतदारसंघातील राजकारणात नव्या घडामोडींना वेग येण्याची शक्यता व्यक्त केली जात असून त्याचा परिणाम रवींद्र धंगेकर यांच्या राजकीय वाटचालीवरही होऊ शकतो, अशी चर्चा रंगू लागली आहे.

**एकेकाळचे प्रतिस्पर्धी आता एकाच पक्षात**

विशेष म्हणजे, कसबा मतदारसंघातील माजी आमदार रवींद्र धंगेकर हे देखील अलीकडेच शिवसेनेमध्ये दाखल झाले असून सध्या ते पक्षाचे पुणे महानगरप्रमुख आहेत. २०१४ च्या विधानसभा निवडणुकीत कसबा मतदारसंघात रोहित टिळक आणि रवींद्र धंगेकर हे एकमेकांविरोधात निवडणूक रिंगणात उतरले होते. त्या वेळी भाजपचे दिवंगत आमदार गिरीश बापट विजयी झाले होते. टिळक यांना सुमारे ३१ हजार, तर धंगेकर यांना सुमारे २६ हजार मते मिळाली होती. आता हे दोन्ही नेते एकाच पक्षात येण्याची शक्यता असल्याने स्थानिक राजकारणात नवे समीकरण तयार होऊ शकते.